Subject code **N 427**

Seat No. / बैठक क्रमांक | | | | | | | |

DATE : 27/06/2026

२७ . ०६ . २०२६ - ११.००

TIME : 11.00

SUBJECT : SOCIAL SCIENCES (73)

HISTORY & POLITICAL SCIENCE—PAPER I (M)

सामाजिक शास्त्रे (७३) इतिहास व राज्यशास्त्र—पेपर—१ (म)

SYLLABUS : (REVISED COURSE)

DURATION : **2** Hours   TOTAL PAGES : **4**   TOTAL MARKS : **40**

वेळ : 2 तास   **पृष्ठे - ४**   **एकूण गुण : ४०**

सूचना :—
(1) ***सर्व*** **कृती/प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.**
(2) **उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतींचे पूर्ण गुण दर्शवितात.**
(3) **प्रश्न क्रमांक 1 ते 5 प्रश्न/कृती इतिहास व प्रश्न क्रमांक 6 ते 9 प्रश्न/कृती राज्यशास्त्र या विषयांवरील आहेत.**
(4) **प्रश्न क्रमांक 2(अ) आणि 8(ब) मधील संकल्पनाचित्रे/कृती त्याच नमुना आराखड्यात पेनाने/पेन्सिलीने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.**
(5) **प्रश्न 1ला (अ), (ब) व प्रश्न 6वा या प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेत एकापेक्षा जास्त वेळा लिहिलेले असेल तर प्रथम लिहिलेले उत्तर हे गुणांसाठी गृहीत धरले जाईल.**

1. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : **3**

(i) चित्रकला आणि शिल्पकला यांचा .... मध्ये समावेश होतो.

(अ) दृक्कला   (ब) ललित कला

(क) लोककला   (ड) अभिजात कला

(ii) भारतातील पहिले इंग्रजी वर्तमानपत्र .... यांनी सुरू केले.

(अ) जेम्स ऑगस्टस हिकी   (ब) सर जॉन मार्शल

(क) ॲलन ह्यूम   (ड) बाळशास्त्री जांभेकर

(iii) कोलकाता येथील .... हे भारतातील पहिले संग्रहालय होय.

(अ) गव्हर्न्मेंट म्युझियम   (ब) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय

(क) छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय   (ड) भारतीय संग्रहालय

(ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून पुन्हा लिहा : **3**

(i) (अ) कुतुबमिनार — मेहरौली

(ब) गोलघुमट — विजापूर

(क) छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे टर्मिनस — दिल्ली

(ड) ताजमहाल — आग्रा

(*ii*)	(अ)	माथेरान	—	थंड हवेचे ठिकाण
	(ब)	ताडोबा	—	लेणी
	(क)	कोल्हापूर	—	देवस्थान
	(ड)	अजिंठा	—	जागतिक वारसास्थळ
(*iii*)	(अ)	मृच्छकटीक	—	हस्तिदंती बाहुली
	(ब)	कथासरित्सागर	—	उडणाऱ्या लाकडी बाहुल्या
	(क)	माझा प्रवास	—	झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांची दिनचर्या
	(ड)	षटकार	—	खेळ या विषयाला वाहिलेले नियतकालिक

---

2. (अ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (कोणतेही दोन) : **4**

(*i*) पुढील तक्ता पूर्ण करा :

जेम्स मिल	द हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया
जेम्स ग्रँट डफ	....
....	द हिस्टरी ऑफ इंडिया
श्री. अ. डांगे	....
....	हू वेअर द शूद्राज

(*ii*) पुढील कालरेषा पूर्ण करा :



(*iii*) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :



(ब) **थोडक्यात टिपा लिहा (कोणत्याही *दोन*) :** **4**

(*i*) सरस्वती महाल ग्रंथालय

(*ii*) कृषी पर्यटन

(*iii*) ॲनल्स प्रणाली.

3. **पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतेही *दोन*) :** **4**

(*i*) वर्तमानपत्रांना इतिहास या विषयाची गरज पडते.

(*ii*) सध्याच्या काळात खेळाचे अर्थकारण बदलले आहे.

(*iii*) आपण आपला नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसा जपला पाहिजे.

(*iv*) प्रादेशिक इतिहासलेखनाला चालना मिळाली.

4. **दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** **4**

महाराष्ट्रातील बाराव्या-तेराव्या शतकातील मंदिरांना 'हेमाडपंती' मंदिरे असे म्हणतात. हेमाडपंती मंदिरांच्या बाह्य भिंती बऱ्याचदा तारकाकृती असतात. तारकाकृती मंदिरांच्या बांधणीत मंदिराची बाह्य भिंत अनेक कोनांमध्ये विभागली जाते. त्यामुळे त्या भिंती आणि त्यावरील शिल्पे यांच्यावर छायाप्रकाशाचा सुंदर परिणाम पाहण्यास मिळतो. हेमाडपंती मंदिरांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे भिंतीचे दगड सांधण्यासाठी चुना वापरलेला नसतो. दगडांमध्येच एकमेकांत घट्ट बसतील अशा कातलेल्या खोबणी आणि कुसू यांच्या आधाराने भिंत उभारली जाते. मुंबईजवळील अंबरनाथ येथील अंब्रेश्वर, नाशिकजवळचे सिन्नर येथील गोंदेश्वर, हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ ही हेमाडपंती मंदिराची उत्तम उदाहरणे आहेत. त्यांची बांधणी तारकाकृती प्रकारची आहे. त्याखेरीज महाराष्ट्रात अनेक ठिकाणी हेमाडपंती मंदिरे पहावयास मिळतात.

प्रश्न :

(*i*) हेमाडपंती मंदिर कोणत्या राज्यात आढळते ? 1

(*ii*) हेमाडपंती मंदिरे कोणत्या शतकातील आहेत ? 1

(*iii*) हेमाडपंती मंदिरांविषयी तुमचे स्वमत मांडा. 2

5. **पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही *दोन*) :** **6**

(*i*) कार्ल मार्क्स यांचा वर्गसिद्धान्त स्पष्ट करा.

(*ii*) उपयोजित इतिहासाचा वर्तमानकाळाशी कसा सहसंबंध असतो ?

(*iii*) पोवाडा म्हणजे काय हे स्पष्ट करा.

(*iv*) दूरदर्शनचा इतिहास सांगा.

6. **दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा :** **2**

(*i*) महाराष्ट्रात स्थानिक शासनसंस्थांमध्ये महिलांसाठी .... जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.

(अ) 25% (ब) 30%

(क) 40% (ड) 50%

(*ii*) लोकशाहीमध्ये .... निवडणुकीत सामील होऊन सत्तेत प्रवेश करतात.

(अ) राजकीय पक्ष (ब) न्यायालये

(क) सामाजिक संस्था (ड) बिगर-शासकीय संस्था

7. **पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा (कोणतेही *दोन*) :** **4**

(*i*) माहितीच्या अधिकारामुळे शासनाच्या कारभारातील गोपनीयता वाढली आहे.

(*ii*) निवडणूक आयोग निवडणुकीदरम्यान आचारसंहिता लागू करते.

(*iii*) लोकशाहीमध्ये चळवळींना फार महत्त्व असते.

8. **(अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा (कोणतेही *एक*) :** **2**

(*i*) प्रादेशिकता

(*ii*) डावे उग्रवादी.

(ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (कोणतीही *एक*) : **2**

(*i*) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :



(*ii*) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :



9. **पुढील प्रश्नाचे थोडक्यात उत्तर लिहा (कोणतेही *एक*) :** **2**

(*i*) निवडणूक आयुक्त पदाविषयी अधिक माहिती लिहा.

(*ii*) राजकीय पक्षांची ठळक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.